॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१५ वा | बुधवार, दि. ०१ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अधिवेशनाचे गांभीर्य ना मंत्र्यांना, ना विरोधकांना!

## मंत्री-विरोधक दोघेही निष्क्रिय, कामकाजाचा दर्जा खालावला

## मंत्री अनुपस्थित, विरोधक अनुत्साही; लोकशाहीचा मंचच कमकुवत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची औपचारिक सांगता झाली असली, तरी या अधिवेशनाने अनेक गंभीर प्रश्न उभे केले आहेत. सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी सभागृहाच्या कामकाजाबाबत दाखवलेली उदासीनता स्पष्टपणे समोर आली असून, विधिमंडळाच्या दजार्बाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

यंदाच्या २०२५-२६ वषार्तील तीन अधिवेशनांमध्ये एकूण ४२ दिवस कामकाज झाले. त्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे २० दिवस, पावसाळी अधिवेशनाचे १५ दिवस आणि हिवाळी अधिवेशनाचे केवळ ७ दिवसांचा समावेश आहे. त्याआधीच्या वर्षी (२०२४-२५) हे कामकाज ४० दिवसांचे होते. कामकाजाचे दिवस घटत चालल्याची बाब यामुळे अधोरेखित झाली आहे. याउलट, केंद्रातील संसदेमध्ये याच कालावधीत सुमारे ६६ दिवस कामकाज झाले आहे.

**मंत्री अनुपस्थितीचा विक्रम; चार तासांचे कामकाज वाया**



अधिवेशनादरम्यान मंत्र्यांची अनुपस्थिती ही सर्वात गंभीर बाब ठरली. विधान परिषदेच्या २० दिवसांच्या कामकाजात तब्बल २ तास ४५ मिनिटे, तर विधानसभेत सुमारे १ तास कामकाज मंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे वाया गेले. एकूण जवळपास चार तासांचा वेळ निष्फळ गेला असून, राज्याच्या विधिमंडळाच्या इतिहासात ही अभूतपूर्व बाब मानली जात आहे.

मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सरासरी दररोज कामकाज स्थगित करण्याची वेळ पीठासीन अधिकाऱ्यांवर आली. यावरून मंत्र्यांचा सभागृहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती ढिला झाला आहे, हे स्पष्ट होते. महायुती सरकारवर विस्कळीत कारभाराचे आरोप राज्यात महायुतीकडे २३८ इतके भक्कम संख्याबळ असतानाही प्रशासनात अपेक्षित समन्वय दिसून येत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला गेल्या दीड वर्षात अनेकदा बचावात्मक भूमिका घ्यावी लागली आहे.

सरकार स्थापन झाल्यापासून विविध मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, काहींना राजीनामे द्यावे लागले, तर काहींना संरक्षण देण्यात आले. तीन पक्षांच्या युतीमुळे निर्णयप्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, प्रचंड बहुमतामुळे सत्ताधाऱ्यांमध्ये सुस्तपणा येतो, याची उदाहरणे पूर्वीही दिसली आहेत.

**विरोधकही निष्क्रिय; चर्चेत सहभाग कमी**

विरोधी बाकांवरही अपेक्षित आक्रमकता दिसली नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेत अनेक महत्त्वाचे नेते अनुपस्थित राहिले. विशेषतः आदित्य ठाकरे यांनी चर्चेत भाग न घेतल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले.

तसेच उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेतील उपस्थिती मर्यादित राहिली. सभागृहात सक्रिय सहभाग घेऊन सरकारला जाब विचारण्याऐवजी पत्रकार परिषद आणि जाहीर सभांमधून टीका करण्यावरच भर असल्याचे दिसून आले.

**आमदारांचीही घटती उपस्थिती**

या अधिवेशनात विधानसभेतील आमदारांची सरासरी उपस्थिती ७८.८४ टक्के, तर विधान परिषदेत ७३.७५ टक्के होती. अनेक आमदारांना मतदारसंघातील कामांना अधिक प्राधान्य देणे पसंत असल्याचे दिसून आले. अर्थसंकल्पावरील चर्चेत ७४ आमदारांनी भाग घेतला, मात्र व्यापक राज्यदृष्टीकोनाऐवजी मतदारसंघापुरते मुद्दे मांडण्याकडेच कल होता.

**लक्षवेधींचा अतिरेक; कायदे चर्चेला दुय्यम स्थान**

लक्षवेधी सूचनांची संख्या वाढल्यामुळे इतर महत्त्वाच्या कामकाजावर परिणाम झाला. कायद्यांवरील सखोल चर्चा कमी होत चालली असून, विधिमंडळाचे मूलभूत कार्यच दुय्यम ठरत असल्याची टीका होत आहे.

दरम्यान, वरिष्ठ नेते जयंत पाटील यांनी 'असे कामकाज यापूर्वी कधीच पाहिले नाही' अशी खंत व्यक्त केली.

**निष्कर्ष : लोकशाहीसाठी धोक्याची घंटा**

एकूणच या अधिवेशनाने राज्याच्या विधिमंडळाच्या कामकाजातील खालावलेला स्तर उघड केला आहे. मंत्री सभागृहात अनुपस्थित, विरोधक निष्क्रिय आणि आमदारांचा कमी सहभाग—या तिन्ही घटकांमुळे लोकशाही प्रक्रियेलाच बाधा येत असल्याचे चित्र आहे. विधिमंडळ हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ मानले जाते. त्यामुळे त्याचे गांभीर्य राखण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही जबाबदारीने वागणे गरजेचे असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त होत आहे.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे माढी, ता. उत्तर सोलापूर माडी-नान्नज डांबरी रोडलगत तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949




आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा. संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर



शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465


# अशोक खरातचं सोलापूर कनेक्शन उघड

## माजी आमदाराकडून खरातच्या मुलीला 32 लाखांचा फ्लॅट भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नाशिकचा भोंदू अशोक खरात याचं सोलापूर कनेक्शन अखेर उघड झालं आहे. विविध क्लृप्त्या करून महिलांना आपल्या जाळ्यात अडकविणाऱ्या अशोक खरात याचे राजकीय नेते हे अनुयायी होते, हे आता लपून राहिलेले नाही.

सोलापूर जिल्ह्यातील एका माजी आमदाराने आपल्या गावात पूजेसाठी आणल्याचे उघड झाले आहे, त्याबाबतचा गौप्यस्फोट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. त्यामुळे सांगोल्यात खळबळ उडाली आहे.

सांगोल्याचे माजी आमदार दीपक साळुंखे (Deepak Salunkhe) यांचे अशोक खरात याच्यासोबतचे व्यवहार हळूहळू पुढे येताना दिसत आहेत. अशोक खरात याच्या मुलीला ३२ किंवा ३४ लाख रुपयांचा फ्लॅट 'गिफ्ट डीड' केलेला आहे. या सर्वांचे धागेदारे आपल्याला सांगोल्यात सापडतील, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.

त्या म्हणाल्या, अशोक खरात आणि इतर सर्व मंडळी ही सांगोल्यात पूजेला गेली होती. अनेक ठिकाणच्या पुजांना रुपाली चाकणकर आणि इतर मंडळी उपस्थित होती. ही सर्व मंडळी खरातचं प्रस्थ वाढविण्यासाठी प्रयत्न करत होती.

अशोक खरातच्या मंदिर आणि परिसराला 2018 मध्ये तत्कालीन पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांच्या कायार्काळात पर्यटनाचा दर्जा मिळाला होता. त्या दजार्मुळेच खरातच्या मंदिराला निधी आणि सुविधा या मिळाल्या होत्या, असाही दावा अंधारे यांनी केला आहे.

ईव्हीडब्ल्यू आणि गृहमंत्री या दोघांना भेटून या सर्वांचे पुरावे द्यायला मी तयार आहे. या संबंधांनी असणारी कागदपत्रे आणि धागेदारे सांगोल्याचे दीपक साळुंखे यांच्यापर्यंत जातात. या सर्व लोकांच्या चौकशा झाल्या पाहिजेत, अशी मागणीही अंधारे यांनी केली.

**हेमंत गोडसेंमुळे अशोक खरात अमित शाहांपर्यंत पोचला**

लोकसभा निवडणुकीच्या वेळी हेमंत गोडसे यांना नाशिकमधून उमेदवारी मिळत नव्हती. पण, नाशिक लोकसभेची उमेदवारी आपल्यालाच मिळावी; म्हणून हेमंत गोडसे यांनी प्रायव्हेट चार्टर्डने अशोक खरात याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे नेले होते. त्यावेळचा अमित शाह यांच्यासोबत अशोक खरात याचा फोटो आहे. शाह यांच्याकडे अशोक खरात याला माजी खासदार गोडसे यांनीच नेले होते.

**अशोक खरातशी आर्थिक संबंध आलेला नाही : दीपक साळुंखे**

सुषमा अंधारे यांनी माझ्यावर चुकीचा आरोप केला आहे. अशोक खरात याच्याशी माझा कुठल्याही प्रकारे आर्थिक संबंध, व्यवहार अथवा फ्लॅट देण्याचा संबंध आलेला नाही. मी ३२ लाखांचे दिलेल्या घराची कागदपत्रं सुषमा अंधारे यांनी दाखवावीत. माझ्या सांगोला तालुक्यातील काही वैफल्यग्रस्त लोकांनी त्यांना ही चुकीची माहिती दिलेली असावी. अशोक खरातची कार्यक्रमाच्या निमित्ताने कधीतरी भेट झालेली असेल मी ते काही नाकारत नाही. पण त्याच्याशी कुठल्याही प्रकारचा आर्थिक संबंध आलेला नाही.

# सोलापूरात 'डीजे'ला बंदी, कोणीही बुकिंग करू नये- आयुक्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गणेशोत्सवापासून सोलापूर शहर पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार अंमलबजावणी केली आहे. आता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकादेखील डीजेमुक्त व्हाव्यात, यासाठी पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी बैठका घेत आहेत.

एमआयडीसी व फौजदार चावडी पोलिस ठाण्यात बैठक झाली. 'डीजे'ला बंदी असल्याने कोणत्याही मंडळाने 'डीजे'साठी ॲडव्हान्स देऊ नये, अन्यथा आर्थिक नुकसान होईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शांतता, निवासी, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रासाठी आवाजाची मयार्दा निश्चित झाली आहे. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लाउडस्पीकर किंवा साऊंड सिस्टीम वापरण्यावरही निर्बंध आहेत. तरीपण, राज्यात सर्वाधिक सण-उत्सव साजरा करणाऱ्या सोलापूर शहरातील प्रत्येक मिरवणुकीत 'डीजे'चा दणदणाट ऐकायला मिळत होता. त्याचा त्रास मिरवणूक मार्गावरील रहिवासी, दवाखान्यातील रुग्ण, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिकांना सोसावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर 'सकाळ'च्या पुढाकाराने 'डीजेमुक्त सोलापूर कृती समिती'च्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर्स, शाळकरी मुले, सर्वसामान्य सोलापूरकरांनी 'डीजे' बंदीसाठी पुढाकार घेतला. त्यानंतर पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी 'डीजे'वर कायमचे निर्बंध घातले. त्यानुसार शहरातील सात पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी अंमलबजावणी करीत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकाही डीजेमुक्त निघतील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिस ठाण्यांमधील बैठकांमध्ये सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**चार स्पीकरसाठी परवानगी**

आवाजाची मर्यादा पाळून मंडळांना मिरवणुकीत चार स्पीकर लावता येतील. देखावे, सामाजिक उपक्रमांवर मंडळांनी खर्च करावा, जेणेकरून महिला, लहान मुले-मुलींना मिरवणुका पाहता येतील, असेही आवाहन पोलिसांनी केले आहे. गणेशोत्सवापासून सर्वच मिरवणुकांमध्ये डीजे दिसलेला नाही. ही प्रथा कोणीही मोडणार नाही, याची खबरदारी पोलिस घेत आहेत.

**सोलापूर शहर डीजेमुक्त, सर्वांनी नियमांचे पालन करावे**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सोलापूर शहरात 'डीजे'साठी बंदी आहे. आतापर्यंत सर्वच मिरवणुका डीजेमुक्त निघाल्या आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काढल्या जाणाऱ्या मिरवणुका देखील डीजेमुक्त निघतील. तत्पूर्वी, सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या पोलिस ठाण्यांमध्ये बैठका घेऊन त्यासंदर्भातील आवाहन केले जात आहे. कोणी डीजे बुकिंग केल्यास त्यांचे नुकसान होऊ नये, हा त्यामागील हेतू आहे.

**- एम. राज कुमार,** पोलिस आयुक्त, सोलापूर शहर

**पोलिसांकडून मंडळांना सूचना**

मंडळांनी विनापरवाना मिरवणूक काढू नये.

कोणीही मिरवणुकीत 'डीजे'चा वापर करू नये, पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. विनापरवाना डीजिटल फलक लावू नये, लेझर लाईटचा वापर करू नये. मिरवणुकीत डीजेचा वापर केल्यास संबंधितांवर कारवाई होईल आणि डीजे जप्त केला जाईल.

# सोलापूरात गॅस टंचाईचा फटका; 500 हून अधिक रिक्षा ठप्प



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईचा फटका आता स्थानिक पातळीवर जाणवू लागला असून सोलापूर शहरातील एलपीजी गॅसवर चालणाऱ्या सुमारे 500 हून अधिक रिक्षा, कार तसेच काही मालवाहतूक वाहने बंद पडल्याची माहिती समोर आली आहे. पुढील किमान पाच ते सहा दिवस गॅसचा पुरवठा होण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत आहेत.

शहरातील अनेक गॅस पंपांवर गेल्या 10 ते 11 दिवसांपासून एलपीजीचा पुरवठा ठप्प आहे. काही ठिकाणी रविवारीपासूनच तुटवडा तीव्र झाला असून वाहनधारकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

**रिक्षाचालकांवर आर्थिक संकट**

एलपीजीवर अवलंबून असलेल्या रिक्षाचालकांचे उत्पन्न थेट ठप्प झाले आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांना रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला असून कंत्राटी रिक्षाचालकांना अक्षरशः घरी बसण्याची वेळ आली आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या चालकांसमोर पालकांना आणि विद्यार्थ्यांना काय उत्तर द्यावे, असा पेच निर्माण झाला आहे.

**प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह..**

प्रशासनाकडून गॅस टंचाई नसल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष परिस्थिती गंभीर असल्याचे चित्र आहे.

पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला असून याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

# प्रत्येक नगरसेवकाला 66 लाखांचा निधी

## अंदाजपत्रकात पाणीपुरवठा सुधारणेवर भर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वषार्चे १४४९ कोटी ७१ लाख ९३ हजार ४०९ रुपयांचे अंदाजपत्रक सोमवारी सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आले. गेल्या चार वर्षांनंतर प्रथमच लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत तब्बल १२ तास सविस्तर चर्चा होऊन रात्री ११ वाजता या बजेटवर शिक्कामोर्तब करण्यात आले. महापौर विनायक कोंड्याल सभेवेळी योग्य समन्वय ठेवल्याचे दिसून आले.



हे वचनपूर्तीचे अंदाजपत्रक आहे. सर्व नगरसेवकांना समान निधी देऊन शहराचा समतोल विकास साधण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**- विनायक कोंड्याल,** महापौर, सोलापूर

**नगरसेवकांना समान निधी आणि विशेष तरतूद**

यावेळच्या अर्थसंकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे प्रशासनाने सुचवलेली ६० कोटींची करवाढ फेटाळून लावत हे बजेट 'करमुक्त' ठेवण्यात आले आहे.

नगरसेवक निधीः प्रत्येक नगरसेवकाला प्रभागाच्या विकासासाठी ६६ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. याशिवाय १६.५० लाख रुपये वॉर्डनिहाय कामांसाठी दिले जाणार आहेत. पदाधिकारी निधीः महापौरांसाठी ५ कोटी, उपमहापौरांसाठी ३ कोटी, स्थायी समिती सभापतींसाठी ३ कोटी आणि सभागृह नेत्यांसाठी ३ कोटी अशी एकूण १४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधा**

शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा सुधारण्यासाठी १० कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे.

**यासोबतच इतर प्रमुख तरतुदी खालील प्रमाणे आहेतः**

ड्रेनेज व स्वच्छताः ड्रेनेज आणि पाणी पुरवठ्यासाठी प्रत्येकी ३ कोटी, तर पावसाळी गटारांसाठी ४ कोटी. आरोग्य व शिक्षणः नवीन शाळा इमारतींसाठी ३.२६ कोटी आणि महिला प्रसूतिगृहांच्या सुधारणेसाठी ३ कोटी.

सुशोभीकरणः शहरातील रस्ते बांधणीसाठी ३ कोटी तर उद्यानांच्या सुशोभीकरणासाठी ३ कोटी रुपये.

(पान 2 वर..)


VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007



# दहावी-बारावीच्या परीक्षेनंतर आता विद्यापीठाच्या परीक्षेतही सीसीटीव्ही कॅमेरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची अंतिम सत्र परीक्षा २ एप्रिलपासून (गुरुवार) सुरू होत आहे. परीक्षा पूर्णपणे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेखाली पार पडणार आहे.

आज (सोमवार) परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयांतील सर्व वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असल्याचा अहवाल प्राचार्यांनी विद्यापीठास सादर केला. त्यानंतरच विद्यापीठाने परीक्षार्थ्यांचे हॉलतिकीट वितरित केले.

इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षांवेळी प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक असतात; मात्र विद्यापीठाच्या परीक्षांसाठी ही अट नव्हती. त्यामुळे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक केले आहेत. यासाठी महाविद्यालयांकडून अहवाल मागविण्यात आला होता. अहवाल प्राप्त झाल्यानंतरच हॉलतिकीट वितरित करण्यात आले.

प्रत्येक महाविद्यालयातील सीसीटीव्हीच्या 'डीव्हीआर'चे आयपी ॲड्रेस विद्यापीठाने घेतले असून, निकाल लागेपर्यंत संबंधित रेकॉर्डिंग जतन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परीक्षा सुरू असताना वीजपुरवठा खंडित झाल्याची कारणे ग्राह्य धरली जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून हे सीसीटीव्ही विद्यापीठाच्या नियंत्रण कक्षाशी जोडले जाणार असून, तेथून परीक्षेवर थेट नजर ठेवता येणार आहे.



**परीक्षेसंदर्भातील सद्यःस्थिती**

एकूण परीक्षा केंद्रे : १०९
एकूण अभ्यासक्रम : १०१
परीक्षार्थी विद्यार्थीः ७०,०००
परीक्षा सत्रे : ३

**तिसऱ्या वर्षाची परीक्षा पुढे ढकलली**

'एलएलबी'ची सीईटी (प्रवेश परीक्षा) १ व २ एप्रिल रोजी होणार आहे. 'बी.पी.एड.'ची सीईटी ४ एप्रिलला, 'एमबीए'ची सीईटी ६ ते ८ एप्रिलदरम्यान, तर 'बी.एड.' व 'एम.एड.'ची सीईटी ९ एप्रिलला होईल. सध्या तृतीय वर्षात शिकणारे विद्यार्थी या परीक्षा देत असल्याने त्यांच्या पाचव्या व सहाव्या सत्रांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. २ ते ९ एप्रिलदरम्यान होणाऱ्या या परीक्षा नंतर घेतल्या जाणार आहेत.

**परीक्षेचे नियोजन अंतिम**

प्रत्येक परीक्षा केंद्रावरील वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. त्यानुसार महाविद्यालयांकडून अहवाल मागविण्यात आले आहेत. परीक्षा सुरू असताना किंवा नंतर विद्यापीठाच्या मागणीनुसार संबंधित वर्गाचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग देणे महाविद्यालयांना बंधनकारक राहील, असे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. २ एप्रिलपासून पदवी, १६ एप्रिलपासून पदव्युत्तर आणि ३० एप्रिलपासून अभियांत्रिकीच्या परीक्षा सुरू होतील.

**- डॉ. श्रीकांत अंधारे,** परीक्षा नियंत्रक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## संपादकीय

# जबाबदारी कुणाची?

बालकांचे संगोपन, कुपोषणाविरुद्धची झुंज, गर्भवती आणि स्तनदा मातांची काळजी ही केवळ योजना नाहीत, तर देशाच्या भविष्याची पायाभरणी आहे. आणि ही पायाभरणी ज्यांच्या खांद्यावर उभी आहे त्या म्हणजे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस. पण आज या कष्टकरी महिलांनाच त्यांच्या हक्काच्या मानधनासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही केवळ प्रशासनाची चूक नाही हा व्यवस्थेचा अपमान आहे.

अंगणवाडी सेविकांना दरमहा १३,००० रुपये आणि मदतनीसांना ७,५०० रुपये इतके अल्प मानधन दिले जाते. त्यातही केंद्र सरकारचा अनुक्रमे ४,५०० आणि ३,५०० रुपयांचा हिस्सा गेल्या तीन महिन्यांपासून थकीत आहे. परिणामी, राज्यातील सुमारे दीड लाख महिला कर्मचाऱ्यांची आर्थिक घुसमट सुरू आहे. ज्यांच्या घरात आधीच तुटपुंज्या उत्पन्नावर संसार चालतो, त्यांच्यासाठी ही परिस्थिती म्हणजे जगण्याचा प्रश्न बनली आहे.

प्रश्न केवळ रकमेचा नाही, तर प्राधान्यक्रमाचा आहे. एका बाजूला मोठमोठ्या घोषणा, योजनांचा गजर, आणि दुसऱ्या बाजूला त्या योजना राबवणाऱ्या तळागाळातील कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधनही न देणे. ही दुटप्पी भूमिका उघडपणे दिसत आहे. 'डबल इंजिन सरकार'चा गजर करणाऱ्यांनी आधी हे पाहावे की, त्यांचे 'मेन इंजिन' खरोखर चालू आहे का ?हे पहिल्यांदाच घडत नाही. जलजीवन मिशन, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांसारख्या केंद्र पुरस्कृत योजनांनाही निधीअभावी ब्रेक लागल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. म्हणजेच, प्रश्न केवळ अंगणवाडीपुरता मर्यादित नाही. तो केंद्राच्या आर्थिक बांधिलकीच्या अपयशाचा व्यापक नमुना आहे. अंगणवाडी सेविका या केवळ कर्मचारी नाहीत; त्या समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा पाया आहेत. कुपोषणाविरुद्ध लढा असो किंवा लसीकरण मोहिमा—प्रत्येक ठिकाणी त्यांची भूमिका निर्णायक असते. कोविडसारख्या संकटकाळातही त्यांनी जीवाची पर्वा न करता सेवा दिली. पण त्याच सेविकांना आज त्यांच्या श्रमाचे मोल मागण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ही परिस्थिती लाजिरवाणीच म्हणावी लागेल.सरकारकडून वारंवार 'महिला सशक्तीकरण'च्या घोषणा केल्या जातात. पण प्रत्यक्षात, महिलांच्या श्रमाचे योग्य मूल्य न देणे हे सशक्तीकरणाचे नव्हे, तर शोषणाचे उदाहरण आहे. तीन-तीन महिने मानधन थकवणे म्हणजे या महिलांच्या स्वाभिमानावर घाला घालणे होय.केंद्र सरकारने थकीत निधी तात्काळ राज्याला वितरित करावा. अशा विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवून त्याला नियमित वेतनाचा दर्जा द्यावा. तळागाळातील कर्मचाऱ्यांना 'योजना अंमलबजावणीची साधने' नव्हे, तर 'व्यवस्थेचे भागीदार' मानले जावे. अशा मागण्या केल्या जात आहेत.शासनाने हे लक्षात ठेवावे की, योजना कागदावर नव्हे तर जमिनीवर जिवंत असतात आणि त्या जिवंत ठेवणाऱ्या अंगणवाडी सेविका आहेत. त्यांच्या पोटावर पाय देऊन कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर कृतीची. कारण अंगणवाडी सेविकांचा प्रश्न हा केवळ वेतनाचा नाही. तो न्याय, सन्मान आणि विश्वासाचा आहे. आणि जर हा विश्वासच तुटला, तर कोणतेही 'इंजिन' सरकारला पुढे नेऊ शकणार नाही.

पान १ वरून

## प्रत्येक नगरसेवकाला...

विशिष्ट प्रकल्पः जुळे सोलापूरमध्ये नाट्यगृह आणि इनडोअर स्टेडियमसाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांची तरतूद.

**महिला आणि कर्मचाऱ्यांसाठी दिलासा**

महिला सुरक्षाः प्रमुख बाजारपेठांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी ५० लाख आणि महिलांसाठी स्वच्छतागृहे व 'पिंक टॉयलेट' बांधण्यासाठी १ कोटींची तरतूद.

मेडिक्लेम योजनाः महापालिका कर्मचाऱ्यांसाठी पहिल्यांदाच ३ कोटी रुपयांची 'मेडिक्लेम' योजना लागू करण्यात आली असून, याचा लाभ ९ हजार कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

**सामाजिक न्याय आणि विकास**

अंदाजपत्रकात विविध समाजांसाठीही तरतूद करण्यात आली आहे. यात लिंगायत भवन, बसवेश्वर पुतळा दुरुस्ती (६० लाख), पद्मशाली समाज कुलदैवत मार्कंडेय मंदिर परिसर सुधारणा (७५ लाख) आणि नियोजित मराठा भवन बांधकामासाठी १ कोटी रुपयांचा समावेश आहे.

**CHANGE IN NAME**

I here by declare that my Old Name **Zartar Naziya Zameer** has been Changed to new Name **Gousiya Zameer Zartar** (Address - 9 Mahatma Fule Nagar Near Aman Hotel Solapur - 413005) Kindly note the same.

**CHANGE IN NAME**

I here by declare that my old name **Zartar Shayesta Zameer** has been changed to new name **Shaista Zameer Zartar** (Address - Mahatma Fule Nagar Near Aman Hotel Solapur -413224) Kindly note the same.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from
**MUSTAFA MEHBOOBSO BAGWAN**
**To**
**MUSTAFA MAHEBOOB BAGWAN** for passport issuance.

# एप्रिल फूल बनवा, हास्याचा आनंद मिळवा...

१ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात एप्रिल फूल दिवस म्हणून साजरा केला जातो.या दिवशी मित्रांना, नातेवाईकांना, ओळखीच्या लोकांना आणि अनोळखी व्यक्तींना खोटे बोलून, काही तरी बनाव करून मुर्ख बनवले जाते.आपण खोटे बोलल्या नंतर समोरची व्यक्ती मुर्ख बनली किंवा पुरती गोंधळली की आपण मुक्तपणे हसतो.ज्यांना हा मुर्ख बनवण्याचा फंडा लक्षात येतो आणि एप्रिल फूल, एप्रिल फूल म्हणून चिडवले की सगळेच पोट धरून हसायला लागतात.परंतु, कधी कधी एप्रिल फूल बनवताना चुका होतात आणि मुर्ख बनवण्याच्या फंदात काहीतरी आक्रित घडते.हळव्या मनाच्या व्यक्ती ही गोष्ट फार मनावर घेतात. मग हसण्याच्या ऐवजी रडण्याची वेळ येते.म्हणून मित्र हो १ एप्रिलला फक्त एप्रिल फूल बनवा,एप्रिल फूल करायला जाल आणि काही वाईट घटना घडणार नाही याची काळजी घ्या. एप्रिल फूल बनवण्याच्या नादात कोणाच्या जीवावर बेतणार नाही याची दक्षता घ्या.

साधारणपणे १६ व्या शतकापासून एप्रिल फूल साजरा करण्याची परंपरा सुरू झाली आहे.आणि ती आतापर्यंत सुरू आहे.

एप्रिल फूल बनाया
आपको गुस्सा आया

एप्रिल फूलच्या दिवशी विविध भारती आणि इतर काही रेडिओ चॅनलवर हे गाणे नक्की ऐकायला मिळते.हा दिवस खरोखर मजेशीर आहे.या दिवशी लहानथोर मंडळी एकमेकांना मुर्ख बनवण्यासाठी आणि खळखळून हसण्यासाठी आतूर झालेले असतात.शाळा व महाविद्यालयांत,घरांत,नोकरीच्या क्षेत्रांत एप्रिल फूल मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. इतरवेळी विनोद व चुटकुले सांगून एकमेकांना हसवले जाते परंतु एप्रिल फूलचा निखळ आनंद हा आगळावेगळा असतो.कधी कधी इतरांना मुर्ख बनवण्याच्या नादात स्वतः मुर्ख बनतो.आणि बाकीचे सर्व लोक खळखळून हसतात.मग काय आपलाही हास्याचा फवारा सुटतो.

विशेष करून एप्रिल फूलच्या दिवशी शिक्षक जेव्हा शाळेत पोहचतात तेव्हा विद्यार्थी शिक्षकांना एप्रिल फूल बनवायला टपलेले असतात.शिक्षकांना काही तरी घाई गडबडीत खोटे सांगून मुर्ख बनवण्यासाठी विद्यार्थी आतूर झालेले दिसतात.काही शिक्षकांना एप्रिल फूलचा विसर पडतो आणि ते एप्रिल फूल होतात. आणि सगळे विद्यार्थी खळखळून हसतात. शिक्षक पदावर नोकरीला लागल्यानंतर पहिल्या वर्षी १ एप्रिलच्या दिवशी मी शाळेत एंट्री करताना अशीच एक मजेशीर घटना घडली.गेटवर थांबलेल्या मुलाने पुढे येऊन देवाचा प्रसाद म्हणून माझ्या हातावर बारीक वाटलेले मीठ ठेवले.प्रसाद म्हणून मी ते मीठ लगेच तोंडात टाकले आणि आपण एप्रिल फूल बनवलो गेलो आहोत हे लक्षात आले.पण मी लगेच डाव बदलला.तोंडावर खारटपणाचा भाव न आणता मी ते मीठ आवडीने गिळले आणि व्वा किती गोड प्रसाद आहे रे हा असे म्हटले.हे ऐकून त्या विद्यार्थ्याला नवल वाटले.मीठ आणण्याच्या ऐवजी चुकुन आपण खरोखर साखरपीठ आणले की काय म्हणून त्याने त्याच्या हातातील मीठ स्वतः खाल्ले.मी ही त्याला एप्रिल फूल बनवले.आणि तो खळखळून हसायला लागला.

लहान मुले त्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार वयाने मोठ्या असलेल्या लोकांना एप्रिल फूल बनवतात आणि खळखळून हसतात.

मोठ्या व्यक्तींनी त्यांना तसा प्रतिसाद दिला पाहिजे आणि लहान होऊन एप्रिल फूल बनले पाहिजे. यामुळे सगळ्यांना हसण्याचा आनंद मिळतो. हसण्याने टेंशन कमी होते.टेंशन कमी झाले की माणूस ताजातवाना होतो. जीवन जगण्याचा आनंद वाढतो. माझे मित्र दत्तात्रय मोहिते नेहमी हलकेफुलके विनोद करतात आणि आम्हाला मनसोक्त हसवतात.जीना है तो हसके जियो हा मूलमंत्र शिकवतात.विलासराव आगलावे, एकनाथ पलमटे,मारोती रुद्रावाड हे माझे मित्र नेहमी लहान सहान विनोद करतात आणि सहवासातील सगळ्या मित्रांना हसवतात.टेंशन नहीं लेने का म्हणत आनंदी जीवन जगण्याचा फंडा शिकवतात.गणेशराव गुळवे गुरुजी, बंकटराव गरड, अप्पाराव लोहारे हे शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या ते सिनियर सिटीझन्स आहेत.

परंतु, ते दररोज इतरांना खळखळून हसवतात,स्वतः हसतात आणि आनंदी राहण्याचा पाठ शिकवतात.

म्हणून एप्रिल फूलच्या निमित्ताने इतरांना एप्रिल फूल बनवा,स्वतः एप्रिल फूल बना आणि सगळे जण मनसोक्त हसून आनंदी व्हा. इतर दिवशीही हे हसणे सुरू ठेवा. एप्रिल फूल दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर मो.९७३०९३९७३२.

## अनगरच्या पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या कार्यक्रमात एन.सी. आर.टी.चे प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक कार्तिक स्वामी देशमाने यांनी विद्यार्थ्यांना दहावीनंतरच्या विविध दिशा व संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ताणतणावमुक्त जीवन कसे जगावे आणि आयुष्यात आनंदी व यशस्वी कसे राहावे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त सूचना दिल्या.

यावेळी विज्ञान विभाग प्रमुख गोरख गायकवाड, कला विभाग प्रमुख रमेश चव्हाण, प्राध्यापिका उज्वला घोलप व संगणक तज्ञ संतोष टकले यांनीही विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शाखांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (माजी प्राचार्य) चंद्रकांत ढोले, प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, प्रवेक्षक राजेंद्र डोके, इयत्ता दहावीचे सर्व वर्गशिक्षक, माध्यमिक विभागातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

उच्च माध्यमिक विभागाचे प्राध्यापक सत्यवान कांबळे, पांडुरंग शिंदे, दाजी गुंड, सत्यवान दाढे, सोमनाथ ढोले, डॉ. प्रशांत कुलकर्णी, परमेश्वर कुंभार, शमा काझी, अर्चना गुंड आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादेव पवार यांनी केले तर सूत्रसंचालन सोमनाथ ढोले यांनी केले.

शाखेची निवड करताना गोंधळलेल्या विद्यार्थी व पालकांना समुपदेशन करून योग्य मार्गदर्शन देण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरला.

## अपघातात शिवश्री मधुकर महाराज बारुळकरांचे निधन

**नांदेड (कटूसत्य वृत्त) :-** मराठा सेवा संघाचे प्रबोधनकार तसेच संत नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे उपाध्यक्ष शिवश्री मधुकर महाराज बारुळकर यांचे आज सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास अपघाती निधन झाले. सिडको नांदेड चौकात हा दुर्दैवी अपघात घडला. मराठा सेवा संघ आयोजित शिवमेळा नांदेड येथे दिवसभर सहभाग घेतल्यानंतर ते घरी परतत असताना ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.



ही बातमी समजताच मराठा सेवा संघासह वारकरी समाजात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव चव्हाण यांनी ही माहिती दिली.

शिवश्री मधुकर महाराज बारुळकर हे मराठा सेवा संघाचे अत्यंत सक्रिय, अभ्यासू आणि प्रबोधनपर कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. समाजजागृतीसाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. आपल्या प्रभावी वक्तृत्वातून आणि उदाहरणांद्वारे त्यांनी अनेकांना प्रेरित केले. त्यांच्या कार्यपद्धतीत 'आधी केले, मग सांगितले' हा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येत असे. ते सदा उत्साही, हसतमुख आणि हजरजबाबी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. कुटुंबवत्सल स्वभाव आणि ठाम वैचारिक भूमिका यामुळे समाजात त्यांचा मोठा मान होता. युवकांना मार्गदर्शन करताना त्यांनी शिक्षण आणि कर्तृत्वावर भर दिला. त्यांच्या दोन्ही मुलांनी एमपीएससी परीक्षेत यश मिळवून नोकरी प्राप्त केल्याचेही त्यांच्या कार्याचे उदाहरण म्हणून सांगितले जाते.

मधुकर महाराज बारुळकर यांच्या निधनाने केवळ त्यांच्या कुटुंबीयांवरच नव्हे, तर मराठा सेवा संघ आणि वारकरी समाजावरही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने प्रबोधनाच्या चळवळीला मोठा धक्का बसल्याची भावना व्यक्त होत आहे.

डॉ. पंजाबराव चव्हाण यांच्या माहितीनुसार, शिवश्री मधुकर महाराज बारुळकर यांच्यावर उद्या, दि. १ एप्रिल रोजी त्यांच्या मूळ गावी बारुळ येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वाहन चालवताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता शक्यतो सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, तसेच अनावश्यक प्रवास टाळावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

शिवश्री मधुकर महाराज बारुळकर यांच्या निधनामुळे समाजाची मोठी हानी झाली असून, त्यांच्या पावन स्मृतींना विविध स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## एआयचा वापर करताना नैतिकतेला महत्व द्या - आनंद कुमार सिन्हा

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** तंत्रज्ञान हे जागतिक परिवर्तनाचे मुख्य साधन आहे. आज जागतिक तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या टप्प्यावर आहे. एआय, जेनरेटिव एआय आणि एजेंटिक एआय हे एआय चे टप्पे आहेत. एआय हे स्पर्धक नसून सहकार्य करणारे साधन आहे. मात्र एआयचा वापर करताना नैतिकतेला महत्व द्या असे मार्गदर्शन ग्लोबल सीआयओ अँड टेक्नॉलॉजी व्हिजनरीचे आनंद कुमार सिन्हा यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठच्या (पीसीयू) स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तर्फे आयइइचा (आय ट्रिपल इ - IEEE) शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयइइ एसीएम टीम चे उद्घाटन करण्यात आले.

अलिअक्सान्द्र मात्सुकौ यांनी बेलारूस देशाबद्दल माहिती देताना सांगितले की, बेलारूस हा औद्योगिकदृष्ट्या सक्षम, प्रगत शेती आणि विकसित सेवा क्षेत्र असलेला देश आहे. उद्योग, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात भारत व बेलारूस सहकार्याच्या मोठ्या संधी आहेत. बेलारूस देशाची उच्च वैज्ञानिक क्षमता असून हे युरेशियन बाजारपेठेत प्रवेशासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे.

यावेळी बेलारूस देशाचे प्रतिनिधी अलिअक्सान्द्र मात्सुकौ, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे, कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंगचे संचालक डॉ. अभिजीत बानूबकोडे, कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. स्वाती शिर्के देशमुख आदी उपस्थित होते.

पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना अवांतर तांत्रिक शिक्षणासाठी आयइइ मधील सहभाग उपयोगी ठरेल.

प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे यांनी सांगितले की, उद्योगात काय घडत आहे याची माहिती, नेटवर्किंगची संधी, आणि व्यावसायिक मानके समजून घेण्यासाठी अशा व्यासपीठाचा उपयोग विद्यार्थ्यांनी करून घ्यावा आणि नेटवर्किंग, टीम बिल्डिंग, नेतृत्व कौशल्य, तांत्रिक ज्ञान विकसित करावे.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य व उद्योजक अजिंक्य काळभोर व नरेंद्र लांडगे, तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## सोलापूरात 'यश लॅक्मे सलून' चा आज शुभारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील उद्योजक सुयश खानापुरे आणि सोनाली खानापुरे यांनी सौंदर्य क्षेत्रात दमदार पाऊल टाकत 'यश लॅक्मे सलून' या अत्याधुनिक उपक्रमाचा शुभारंभ बुधवार, १ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता सात रस्ता, मोदीखाना येथे पार पडणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली. यावेळी बोलताना सुयश खानापुरे यांनी सांगितले की, रिअल इस्टेट व बांधकाम क्षेत्रात यशस्वी वाटचाल केल्यानंतर आता ग्राहकांना दर्जेदार आणि विश्वासार्ह सौंदर्य सेवा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. सोलापूरकरांना महानगरांप्रमाणे आधुनिक आणि उच्च दर्जाच्या ब्युटी सेवा उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सोनाली खानापुरे यांनी सांगितले की, 'लॅक्मे सलून' हा देशातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह ब्रँड असून, ४० वर्षांहून अधिक अनुभवाच्या जोरावर त्याने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.देशातील १२५ हून अधिक शहरांमध्ये ४०० पेक्षा जास्त शाखांद्वारे सेवा देणाऱ्या या प्रतिष्ठित ब्रँडची सुविधा आता सोलापूरकरांसाठी उपलब्ध होत आहे. हेअर कट, हेअर कलरिंग, स्किन केअर, फेशियल, ब्रायडल मेकअप आणि आधुनिक ग्रूमिंग सेवा यामध्ये हा ब्रँड विशेष प्रसिद्ध आहे.ह्यश लॅक्मे सलून' मध्ये ग्राहकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रशिक्षित स्टायलिस्ट, अनुभवी ब्युटी एक्सपर्ट्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाची स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या निकषांचे काटेकोर पालन यामुळे ग्राहकांना एक वेगळा आणि समाधानकारक अनुभव मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



या उद्घाटन सोहळ्यास शहरातील मान्यवर, व्यावसायिक तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस उद्योजक मयूर दरगड, लॅक्मे समूहाचे आदित्य पेठकर आदी उपस्थिती होते.

## प्रदेश कार्यालय मुंबई येथे अनुसूचित जमाती मोर्चा बैठक संपन्न

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** नरिमन पॉईंट मुंबई येथील प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या सूचनेनुसार अनुसूचित जमाती मोर्चा बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रथम नागपूर येथील आदिवासी समाजातील राज्यसभा खासदार म्हणून नियुक्त झालेल्या सौ.मायाताई ईनवते व अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश अध्यक्ष मा. आमदार देवराज होली यांचा सत्कार प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला व नंतर सभेला सुरुवात झाली त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील विविध घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी साकारलेल्या भूमिका महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रमुख पदाधिकारी यांना कशाप्रकारे राबवाव्यात याबाबत आदिवासी मंत्री अशोक उईके यांनी मुद्देसूदपणे सांगितले. तसेच आदिवासी लोकांना जातीचे दाखले, रेशन कार्ड, रहिवासी दाखला, मिळत नसल्यामुळे शासनाच्या अनेक योजना पासून त्यांना वंचित रहावे लागत आहे असे प्रमुख पदाधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले असता प्रत्येक तालुका जिल्हा निहाय वरील बाबीचा विचार करून सर्व कागदपत्राची पूर्तता करण्यात येईल असे आदिवासी मंत्री अशोक उईके यांनी सांगितले.



आदिवासी पारधी समाजाला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक आर्थिक महामंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली असून त्याची समिती स्थापन करण्यात आली आहे त्यामध्ये खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी मंत्री अशोक उईके, यांनी जातीने लक्ष घातले आहे त्यामुळे भविष्यात येणाऱ्या काळात आदिवासी पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार यांना आर्थिक बळ मिळाल्याने समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी वेळ लागणार नाही असे मनोगत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बोलून दाखवले.

नव्याने राज्यसभा खासदार म्हणून नियुक्त झालेल्या नागपूरच्या माजी नगराध्यक्ष सौ.मायाताई इनवते यांनी आपले मनोगत व्यक्त केले की मला अचानक पणे राज्यसभा खासदार म्हणून नियुक्ती झाल्याचे कळताच मला विश्वासच बसला नाही इमानदारीने एकनिष्ठ राहून पक्षाचे काम करत राहिल्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आदिवासी समाजाला एक प्रकारे न्याय दिला आहे असे भावनिक होऊन मनोगत व्यक्त करताना उपस्थित सभागृहात भारत माता की जय,वंदे मातरम अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला व टाळ्यांचा कडकडाट होऊन आवाज घुमत राहिला.

यावेळी व्यासपीठावरील प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी मंत्री अशोक उईके,खासदार मायाताई इनवते,आमदार हरिश्चंद्र भोई,अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश अध्यक्ष देवराज होली, प्रदेश संयोजक किशोरजी काळकर, एस.टी. मोर्चा महामंत्री सुदर्शन शिंदे,यांची मुद्देनिहाय प्रेरणादायी भाषणे झाली. सदर प्रसंगी महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती होती त्यामध्ये प्रामुख्याने एस.टी. मोर्चा उपाध्यक्ष कोमल चव्हाण, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका सौ.राजश्री चव्हाण, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल भिमराव चव्हाण, पुण्याच्या नगरसेविका सौ.राजश्री काळे, एस.टी मोर्चा सचिव नकुल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर भोसले, अॅ सुरेश काळे, उद्धव भोसले, साहित्यिक-समाजसेवक देविदास काळे, शिवा काळे-मुंबई, रमेश पवार, सचिन काळे, शितल काळे, बाईती बाई काळे.आदीसह महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात आदिवासी पदाधिकारी उपस्थित होते.

### वात्रटिका

**एप्रिल फूल**

पोळा नाही तरी सजले बैल
अंगावर मखमली झुल...
शेपटी उंचावून उधळतील ते
समजून घ्या आज एप्रिल फूल...
बेलगाम जसे बैल तसे घोडे
चौखूर उधळू लागले...
बाबाने सांगितले तसे नेते
त्यांच्या मागे उसळू लागले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गुरुकुल शिक्षणातून घडतो सर्वांगीण विकास : मकरंद अनासपुरे

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** गुरुकुल पद्धतीचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता जीवनमूल्ये, संस्कार आणि सामाजिक भान विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मकरंद अनासपुरे यांनी केले. श्रीकृष्ण गुरुकुल संस्थेचा पाचवा वर्धापन दिन वर्षा उसगावकर आणि विश्वास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला खासदार प्रा. ज्योती वाघमारे, माजी आमदार राजन पाटील, ज्येष्ठ नेते शिवानंद पाटील, जि.प. सदस्य सचिन जाधव,



ॲड. अर्जुन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा 'जीवनगौरव'पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रगतिशील शेतकरी रामराव केरबा भोसले पाटील, माजी सभापती जालिंदर लांडे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. दीपक गायकवाड, प्रा. प्रकाश भोसले, सरपंच अंजली भोसले-पाटील आदींचा समावेश होता. अनासपुरे पुढे म्हणाले की, प्रा. प्रमोद आवताडे यांनी ग्रामीण भागात गुरुकुल शिक्षण पद्धती रुजवून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाची उत्कृष्ट सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यांचा हा उपक्रम राज्यातील शिक्षण संस्थांसाठी आदर्शवत ठरत आहे. प्रा. प्रमोद आवताडे यांनी सांगितले की, शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने पाच वर्षांपूर्वी वाघोली वाडी येथे श्रीकृष्ण गुरुकुलची स्थापना करण्यात आली. पालकांनी दाखविलेल्या विश्वासामुळे आणि अनुभवी शिक्षकवर्गाच्या बळावर संस्थेची प्रगती वेगाने होत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील गरड यांनी केले, तर आभार प्रदर्शन हणमंत निकम यांनी मानले. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजीव माने यांची अध्यक्षपदी पुनर्निवड; मिलिंद साळुंखे उपाध्यक्षपदी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा राजीव माने यांची, तर उपाध्यक्षपदी मिलिंद साळुंखे यांची निवड एकमताने करण्यात आली. संस्थेच्या कार्यालयात झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

त्रैवार्षिक (२०२५-२६ ते २०२८-२९) निवडणुकीत के. सर्जे राव जाधव विकास आघाडी पॅनलने सातही जागांवर विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा आपले वर्चस्व सिद्ध केले. त्यामुळे संस्थेच्या सत्ताकारणात या पॅनलची पकड अधिक मजबूत




झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

नवीन विश्वस्तांच्या बैठकीत विकास सुरवसे यांनी अध्यक्षपदासाठी राजीव माने, तर उपाध्यक्षपदासाठी मिलिंद साळुंखे यांची नावे सुचविली. या प्रस्तावाला महादेव माने यांनी अनुमोदन दिल्यानंतर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

यावेळी नूतन विश्वस्त प्रकाश पडवळकर, बाळासाहेब मोरे, महादेव माने, विकास सुरवसे आणि तानाजी चव्हाण यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. तसेच मावळते अध्यक्ष प्रल्हाद जाधव व उपाध्यक्ष अमर शिंदे यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. शरदराव फुटाणे यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुरेशचंद्र सूर्यवंशी, स्वामीराव पाटील, शंकर पवार, संतोष जाधव, शरद जंगाले, विकास गोडसे, प्रवीण घाडगे, गोटू माने, माणिक बिराजदार, विक्रम गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

**विश्वासाला पात्र ठरण्याचा निर्धार**

सभासदांनी सलग दुसऱ्यांदा दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत, संस्थेचा कारभार पारदर्शक ठेवून तिचा लौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार अध्यक्ष राजीव माने यांनी व्यक्त केला. कै. आमदार बी. टी. माने, स्व. सर्जे राव जाधव व कै. उद्धवराव जंगाले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा विस्तार झाला असून, ही विकासाची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. १९२७ साली स्थापन झालेल्या या तालुक्यातील जुन्या व नामांकित संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याची ग्वाहीही माने यांनी दिली.

# गुन्हेगारांवर पोलिसांचा शिकंजा
## विशेष पथकाची थेट छापेमारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण भागातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक सक्रिय झाले असून, जुगार अड्डे, अवैध वाळू वाहतूक, ऑर्केस्ट्रा बारमधील गैरप्रकार, अवैध दारुनिर्मिती व विक्री, तसेच लॉजमधील अनैतिक प्रकारांवर कडक नजर ठेवण्यात येणार आहे.

अलीकडेच ऑर्केस्ट्रा बारमधील अवैध प्रकारांबाबत राज्याच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर स्थानिक पोलिसांच्या कार्यप्रणालीवरही संशय व्यक्त करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

या पथकाला पोलिस अधीक्षक किंवा अपर पोलिस अधीक्षकांकडे येणाऱ्या गोपनीय माहितीच्या आधारे थेट कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. माहितीची शहानिशा करून



पथक संबंधित ठिकाणी अचानक छापे टाकते. अनेकदा स्थानिक पोलिसांना पूर्वकल्पना न देता कारवाई करण्यात येते, हे या पथकाचे वैशिष्ट्य आहे.

सोलापूर जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक, जुगार अड्डे, ऑर्केस्ट्रा बारमधील अश्लील नृत्य व पैशांची उधळण, लॉजमध्ये चालणारे वेश्या व्यवसाय, तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्री यांसारखे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. स्थानिक पोलिसांकडून कारवाई होत असली तरी हे प्रकार पूर्णपणे थांबलेले नसल्याचे दिसून येते.

विशेष पथकात स्थानिक गुन्हे शाखा, कंट्रोल रूम आणि मुख्यालयातील अधिकारी व अंमलदारांचा समावेश असून, प्रत्येक कारवाईसाठी वेगवेगळे पथक तयार केले जाते. अधिकारी व कर्मचाऱ्यांची सतत अदलाबदल केली जात असल्याने कारवाई अधिक गोपनीय आणि प्रभावी ठरत आहे.

**'गोपनीय माहितीच्या आधारे तातडीने कारवाई'**

पोलिस अधीक्षक किंवा अपर अधीक्षकांना मिळालेल्या माहितीनुसार त्वरित पडताळणी करून विशेष पथकाद्वारे कारवाई केली जाते. पथकातील अधिकारी व अंमलदारांची नियमित अदलाबदल केली जाते, अशी माहिती अपर पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी दिली.

दरम्यान, सोलापूर ग्रामीणमध्ये २५ पोलिस ठाण्यांमार्फत सुमारे साडेचार हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत आहे. तरीही, थेट वरिष्ठांकडे येणाऱ्या तक्रारींवर विशेष पथकाकडून स्वतंत्रपणे कारवाई केली जाणार असून, नागरिकांनी अवैध धंद्यांची माहिती थेट पोलिस प्रशासनाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ५०० विकासकामांचा पाऊस
## निधीअभावी दोनच कामांना हिरवा कंदील

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपरिषदेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत तब्बल ५०० विकासकामांचा प्रस्ताव समोर आल्याने एकच गोंधळ उडाला. नगरपरिषदेचे उत्पन्न केवळ २१ कोटी रुपये असताना सुमारे २०० कोटी रुपयांच्या कामांची मागणी झाल्याने अखेर प्रत्येक नगरसेवकाच्या दोनच कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला.

नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी ही सभा पार पडली. पदाधिकारी निवडीनंतरची ही पहिलीच महत्त्वाची बैठक असल्याने विकासकामांच्या मंजुरीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जवळपास तीन तास चाललेल्या या सभेत सुरुवातीपासूनच सत्ताधारी व विरोधी गटांमध्ये खडाजंगी पाहायला मिळाली.

शहरातील १७ प्रभागांतील ३८ नगरसेवकांनी आपापल्या भागातील प्रलंबित प्रश्न मांडत विकासकामांची यादी सादर केली. ही यादी सुमारे ५०० कामांची असून त्यासाठी २०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता भासणार असल्याचे स्पष्ट झाले. यावर ज्येष्ठ नगरसेवक लक्ष्मण शिरसट यांनी इतक्या कामांसाठी निधी उपलब्ध आहे का, असा सवाल उपस्थित केला.

चर्चेनंतर अखेर प्रत्येक नगरसेवकाच्या दोन विकासकामांना प्राधान्य देण्याचा तोडगा काढण्यात आला. कोणत्याही प्रभागावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही नगराध्यक्षा डॉ. भालके यांनी दिली.

**सभेत खडाजंगी; मिनिट्सवरून वाद**

सभेच्या सुरुवातीलाच मागील इतिवृत्त वाचनावरून वाद निर्माण झाला. भाजप गटनेते भागवत बडवे यांनी कॉरिडॉर प्रकल्पासाठी असलेल्या १० कोटींच्या तरतुदीबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर नगरसेवक राहुल शिंदे यांनी ठराव स्थगित ठेवल्याचे स्पष्ट केले. मात्र, मिनिट्स न मिळाल्याच्या कारणावरून बडवे व शिंदे यांच्यात शाब्दिक चकमक झाली.

**शहरातील विविध प्रश्नांवर चर्चा**

सभेत नगरसेवक भैय्या कळसे यांनी वृक्षारोपणावर झालेल्या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित केला. तर सुनील वाळूजकर यांनी नगरपरिषदेच्या शाळांची दुरवस्था मांडत विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. या चर्चेत अनेक नगरसेवकांनी सहभाग घेतला.

**पुतळा प्रश्नावर तोडगा शोधण्याचा प्रयत्न**

दिवंगत माजी आमदारांचे पुतळे एकाच ठिकाणी उभारण्याच्या प्रस्तावावरही चर्चा झाली. काही कुटुंबीयांनी याला विरोध दर्शवल्याने संबंधित कुटुंबांशी पत्रव्यवहार करून पुढील निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले.

**४१ कोटींचे देणे; उत्पन्न वाढीचे उपाय सुचविले**

सभेत नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीची श्वेतपत्रिका सादर करण्यात आली.

२०१९ ते मार्च २०२६ अखेरपर्यंत पालिकेवर ४१ कोटी रुपयांचे देणे असल्याचे स्पष्ट झाले. तर विविध कर व शुल्कांमधून सुमारे २१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचे सांगण्यात आले. उत्पन्न वाढीसाठी मालमत्ता कर, पाणीपट्टी वाढविणे, गाळ्यांचे भाडे वाढविणे तसेच थकीत वसुली करण्याचे उपाय सुचविण्यात आले. तसेच शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

# उष्णतेने हैराण सोलापूरकर
## सहा दिवस ३९ अंशांची नोंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाचा मार्च महिना सोलापूर जिल्ह्यात विक्रमी उष्णतेचा ठरत असून, मागील सहा दिवसांपासून तापमान ३९ अंश सेल्सिअसच्या आसपास स्थिर राहिले आहे. तापमानात मोठा बदल जाणवत नसला तरी उकाड्याच्या झळा मात्र कायम जाणवत आहेत. सोमवारी दिवसभर ऊन-ढगाळ वातावरणाचा खेळ सुरू होता, त्यामुळे वातावरणात काहीसा बदल जाणवला; मात्र उष्णतेत विशेष घट झाली नाही.

२७ मार्च रोजी ४०.४ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली होती. त्यानंतर २५ ते ३० मार्चदरम्यान तापमान सातत्याने ३९ अंशांच्या आसपासच राहिले. २६ मार्चला ३९.४ अंश, २७ मार्चला ४०.४ अंश, २८ मार्चला ३९.५ अंश, २९ मार्चला ३९.२ अंश आणि ३० मार्चला ३९.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.

भारतीय हवामान विभाग यांच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईकडून मिळालेल्या अंदाजानुसार ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता आहे. या




कालावधीत कमाल तापमान ३७ ते ३९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३ ते २५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तसेच सकाळची सापेक्ष आर्द्रता ४४ ते ५० टक्के, तर दुपारची आर्द्रता २८ ते ३३ टक्क्यांच्या दरम्यान राहणार आहे. वाऱ्याचा वेग ताशी ६ ते १६ किमी इतका राहण्याची शक्यता असून, काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि गारपीट होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. दरम्यान, १ व २ एप्रिल रोजी जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीचा विजयी टीमचा मुंबईत सत्कार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने अकलूज नगरपरिषदेत मिळवलेल्या एकहाती व निर्विवाद विजयाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत विजयी पदाधिकाऱ्यांचा भव्य आणि उत्साहपूर्ण सत्कार सोहळा पार पडला. पक्षाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते नगराध्यक्ष रेश्माताई अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील आणि सर्व विजयी नगरसेवकांचा गौरव करण्यात आला.



अकलूज नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करत स्थानिक राजकारणात आपली मजबूत पकड पुन्हा अधोरेखित केली आहे. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली असून, राज्यभरात या निकालाची दखल घेतली जात आहे.

सत्कार सोहळ्यात क्रांतिसिंह माने पाटील, सचिन देशमुख, विशाल मोरे, नासिक आबा सोनवणे, मोहसीन शेख, विलास क्षीरसागर, अझर शेख, मिलिंद कोतमिरे, युवराज दोरकर, वैशाली भोसले, मनीषा तिकोटे, प्रियांका गायकवाड, मंदाकिनी पाडोळे, मृदुला सूर्यवंशी, प्रतिभा गायकवाड, शितल बनपट्टे, रेश्मा तांबोळी या नगरसेवकांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कामगिरीचे कौतुक करत पक्ष नेतृत्वाने भविष्यातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले की, 'अकलूजमधील हा विजय केवळ निवडणुकीतील यश नसून, तो जनतेच्या विश्वासाचा आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीचा परिणाम आहे. विकासाभिमुख कामातून हा विश्वास अधिक दृढ करा,' असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

नगराध्यक्ष रेश्माताई अडगळे आणि उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी या सन्मानाबद्दल आभार व्यक्त करत, अकलूजच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमाला लालासाहेब अडगळे, महेश सूर्यवंशी, धनाजी भोसले, संजय पाडुळे, लखन गायकवाड, मोहन तिकोटे, विलास गायकवाड, रवी लव्हाळे, सुनील पवार, गणेश वसेकर, परशुराम बनपट्टे, पुष्कराज दिवाडकर, इकबाल तांबोळी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १५१ बेवारस वाहने मालकाच्या प्रतीक्षेत

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या अथवा बेवारस आढळून अलेल्या, विविध प्रकारचे १५१ बेवारस वाहने, अकलूज पोलिस ठाण्याच्या प्रांगणात धुळखात पडले असून ते आपल्या मालकाच्या प्रतीक्षेत आहेत.

अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी, बेवारस वाहनांची निर्गती करणे करीता, विशेष मोहिम राबवुन जास्तीत जास्त, बेवारस वाहनांची निर्गती करणे बाबत आदेशित केले आहे.

अकलुज पोलीस स्टेशन आवारामध्ये बेवारस स्थितीत व वेगवेगळ्या कारवाई दरम्यान मिळुन आलेली १५१ वाहने लावण्यात आलेली आहेत. अकलूज पोलिसांनी सदरच्या वाहनाच्या मालकीबाबत माहिती घेतली असता, माहिती मिळुन आलेली नाही. सदर वाहनांची यादि अकलुज पोलीस स्टेशन येथिल नोटिस बोर्डावर तसेच अकलुज



बस स्थानक, माळशिरस, वेळापूर व नातेपुते पोलीस स्टेशन, येथे लावण्यात आलेली आहे. सदरची वाहने ज्यांची आहेत अशा लोकांनी वाहनाबाबतची खात्री करुन कागदपत्रासह अकलूज पोलीस स्टेशन येथे हजर राहुन अर्ज करावा व १५ दिवसाचे आतमध्ये मालकि हक्कबाबत दावा करावा असे आवाहन अकलूज पोलीस ठाण्याचे कर्तव्यनिष्ठ पोलिस निरीक्षक निरज उबाळे यांनी केले आहे.

सदर बाबत काही माहिती हवी असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करण्यात यावा

**अकलूज पोलीस स्टेशन:-**
०२१८५२२२१००,
पोहेकॉ/९१ तानाजी टिंगरे:-७०२०१०५४२७,
८८०५८९९०९१
**पोकॉ/४५२ मोहन मरके:-**
९६८९८५८४२७

# अकलूज परिसरात भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अहिंसा परमो धमार्ची शिकवण देणारे जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती अकलूज व परिसरामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी सकाळी ७ वाजता शिवापूर पेठ येथील विसाहुमड दिगंबर जैन मंदिरातून भगवान महावीरांच्या पालखीची परिसरातून शांतीसागर ढोल पथकासह सुवाद्य मिरवणुक काढण्यात आली.या मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्वच श्रावक, श्राविकांनी भगवान महावीरांचा जयघोष केला.

दुपारी मंदिरात भगवान महावीरांच्या मूतीर्चा अभिषेक मंगेश गांधी व सौ.मयुरा गांधी यांच्या हस्ते झाला तर बाहुबली गांधी यांच्यावतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.सायंकाळी सुनील दोशी व परिवाराच्या वतीने भगवान महावीरांचा जन्म



सोहळा साजरा करण्यात आला. अध्यक्ष इंद्रराज दोशी यांनी सर्वांचे स्वागत केले.यावेळी सर्वच महिला मंडळे व सामाजिक मंडळांनी दिवसभराच्या उपक्रमात सहभाग घेतला.

संग्रामनगर येथे ही सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीरांचा जन्म सोहळा साजरा करण्यात आला.सकाळी संग्रामनगर परिसरातून भगवान महावीरांची पालखी वाजत गाजत काढण्यात आली.भगवान महावीरांचा अभिषेक भरतेश उपाध्ये व सौ.सविता उपाध्ये यांच्या हस्ते झाला.दुपारी समाजाच्या वतीने सर्वांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.सायंकाळी भगवान महावीरांच्या जन्म सोहळ्यात सौ. कविता मगदूम,सौ. सुवर्णा सावळे, सौ.सुनीता कवठे यांच्यासह समाजातील महिलांनी सहभाग घेतला.येथील सर्व समाज बांधवांनी सदरचा सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला. सुभाष पंडीत यांनी धर्मप्रभावनेतून वातावरण मंत्रमुग्ध केले.भारत वर्ष दिगंबर जैन तिर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मिहीर गांधी व सन्मती सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी येथे भेट देऊन भगवान महावीरांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

# पहिल्या राज्यस्तरीय 'चाचा नेहरू बाल महोत्सवा' चा बक्षीस वितरणाने उत्साहात समारोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य व सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव (सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिला राज्यस्तरीय 'चाचा नेहरू बाल महोत्सव 2025-26' उत्साहात पार पडला. तीन दिवस रंगलेल्या या महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा सोमवारी दिमाखात संपन्न झाला.

या महोत्सवात पुणे विभागाने २४ सुवर्ण पदकांची कमाई करत प्रथम क्रमांक पटकावला व मानाची चॅम्पियन ट्रॉफी आपल्या नावावर केली. इतर विभागांनीही उल्लेखनीय कामगिरी करत स्पर्धा रंगतदार केली. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम (जि.प. सोलापूर) यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले होते. प्रमुख उपस्थितीत विभागीय उपआयुक्त संजय माने (पुणे विभाग), पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, सिंहगडचे मुख्य निबंधक डॉ. डी. आय. नवले,



जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय खोमणे, अविनाश मगर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच बाल कल्याण समिती सदस्य सुवर्णा कोकरे, दीपक ढेपे, अमृत सरडे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी किरण सूर्यवंशी, बालाजी अल्लडवाड, समाधान नागणे, विशाल भोसले, अभिजित मोलाने, राहुल चव्हाण, सुवर्णा जाधव, आस्मा आत्तार, प्रतिभा साखरे, भुजंग चिंताकोटे, अक्षय साळुंखे, अच्युत शेवाळे, युवराज गाढवे, शेखर बंडगर, पद्माकर सुरुषे, मिलिंद घाडगे, मारुती ताटे, उज्वला कापसे, पिंकी वावरे, सुप्रिया बेलोशे, सचिन चव्हाण, अमोल जमदाडे, मिथुन पवार, आर. आय. विजापूरे तसेच महिला व बालविकास विभागाच्या कर्मचारीवर्गाचे विशेष सहकार्य लाभले. तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात धावणे, लांब उडी, रिले, कबड्डी, खो-खो यांसारख्या क्रीडा स्पर्धांसह चित्रकला, निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर आणि समूह नृत्य अशा सांस्कृतिक स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. राज्यभरातून आलेल्या बालकांनी आपल्या क्रीडा व कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

समारोप प्रसंगी मान्यवरांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत, 'खेळातून एकात्मता, आत्मविश्वास आणि जीवनात हार न मानण्याची प्रेरणा मिळते,' असा संदेश दिला. एकूणच, पहिल्याच वर्षी भव्य यश मिळवत 'चाचा नेहरू बाल महोत्सव' हा उपक्रम राज्यातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला. सूत्रसंचालन गौरी जिंदे व रेश्मा गायकवाड यांनी केले.

# झारखंडच्या कृषि आयुक्तांनी विद्यार्थ्यांसोबत साधला संवाद

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री .शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय याच्या अलीपूर येथील कृषी प्रक्षेत्रामधील विविध विकास कामाची पाहणी तसेच द्राक्ष लागवडीचा शुभारंभ, झारखंड राज्यामध्ये वरिष्ठ भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये असणाऱ्या तसेच संस्थेचे माजी विद्यार्थी रमेश घोलप यांच्या हस्ते पार पडला या कार्यक्रमानिमित्त श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे कृषीभूषण राजाभाऊ देशमुख , नितीन बापू कापसे, नागेश अक्कलकोटे , प्रक्षेत्र अधीक्षक डॉ. शेंडे एस. एस., प्रा. आशा आदलिंगे , प्रा. शितल शेळके, कृषी सहाय्यक संकेत कांदे व प्रथम वर्षातील विद्यार्थी आधी उपस्थित होते. द्राक्ष लागवडचा रमेश घोलप यांच्या हस्ते शुभारंभ झाल्यानंतर त्यांनी प्रथम वर्षाच्या



विद्यार्थ्यासोबत मनमोकळेपणाने संवाद साधला यामध्ये त्यांनी कृषीचे विद्यार्थी म्हणून समाजासाठी आपण कोणत्या प्रकारे कार्य केले पाहिजे ,आपलं करियर कसं निवडलं गेलं पाहिजे यासंबंधी मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेमध्ये मध्ये जाण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न केला अभ्यास कसा प्रकारे केला पाहिजे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

# शिर्डी लोकसभा संपर्क प्रमुखपदी खा. ज्योती वाघमारे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षाच्या संघटनात्मक रचनेत फेरबदल करण्यात आले असून, खासदार ज्योती वाघमारे यांची शिर्डी लोकसभा संपर्क प्रमुख या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

सध्या शिर्डी लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे भाऊसाहेब राजाराम वाकचौरे हे खासदार आहेत.

आगामी काळातील निवडणुका आणि पक्ष संघटनेची बांधणी लक्षात घेता शिर्डी लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी खासदार वाघमारे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

नेत्यांचे मानले आभार

या निवडीबद्दल बोलताना



खासदार ज्योती वाघमारे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत. "पक्षाने माज्यावर जो विश्वास दाखवून ही मोठी जबाबदारी दिली आहे, ती मी पूर्ण निष्ठेने पार पाडेन. शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे विचार आणि जनहितार्थाची कामे घराघरांत पोहोचवण्याचा माझा मानस आहे," अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

या नियुक्तीबद्दल त्यांचे राजकीय आणि सामाजिक स्तरातून अभिनंदन होत असून, यासोबतच अन्य लोकसभा मतदारसंघांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सर्व नवनियुक्त संपर्क प्रमुखांचेही त्यांनी अभिनंदन केले आहे.

**सध्या शिर्डीत आहे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा खासदार**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शिर्डी (रउ) मतदारसंघातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भाऊसाहेब राजाराम वाकचौरे विजयी झाले आहेत. त्यांनी शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार सदाशिव लोखंडे यांचा सुमारे ५०,००० हून अधिक मतांच्या फरकाने पराभव केला. लोखंडे हे 2014 ते 2024 खासदार म्हणून कार्यरत होते.